# शिवाजी विद्यापीठाची रोपवाटिका बनली स्वयंपूर्ण



## विविध प्रकारच्या देशी रोपांची शासकीय दरात विक्रीही सुरू

आर. के. नगर, ता. २५ : वाजी विद्यापीठाची रोपवाटिका ण्याअभावी एकेकाळी बंद होती. त्र, आता या रोपवाटिकेचे रुपडेच लटले आहे. आता येथे विविध प्रकारच्या देशी वृक्षांची रोपे तयार केली असून, ती विक्रीसाठीही उपलब्ध आहेत. विद्यापीठाच्या ग्रंथालयाशेजारी असणाऱ्या पाण्याच्या टाकीच्या खाली ही रोपवाटिका आहे.

**पाण्याच्या उपलब्धतेनंतर रोपवाटिका स्वयंपूर्ण करण्याचे ध्येय आम्ही सर्वांनी निश्चित केले. त्यासाठी लागणारी सर्व साधने प्रशासनाने उपलब्ध करून दिली. आज विविध फुले, झाडे यांची रोपे तयार आहेत. एकेकाळी विद्यापीठाला बाहेरून रोपे आणावी लागत होती. आता विद्यापीठाच्या रोपवाटिकेतील अतिरिक्त रोपे अन्यत्र लावण्यासाठी पाठवली जातात. रोपवाटिकेत देशी प्रजातींची रोपे करण्यावर भर आहे.**

– **डॉ. व्ही. एन. शिंदे**, उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाला सुमारे आठशे एकरचा परिसर लाभला आहे. विविध प्रकारची झाडे, प्राणी, किटक, पक्षी, सरीसृप येथे पाहायला मिळतात. विद्यापीठाचा परिसर हिरवाईने नटला आहे. यामध्ये तेथील रोपवाटिकेचे योगदान फार मोलाचे आहे. कारण या ठिकाणी तयार केलेल्या विविध वृक्षांची रोपे विद्यापीठात परिसरात लावली जातात. त्यामुळे विद्यापीठाचा आवार हरित झाला आहे. मात्र, एकेकाळी पाणी नसल्याने रोपवाटिकेची रयाच गेली होती. इथले रोपे बनवण्याचे काम पूर्णपणे थांबले होते. एकदा तर विद्यापीठात वृक्षारोपण करण्यासाठी सोलापूर विद्यापीठातून रोपे मागवली. मात्र, नंतर विद्यापीठात शेततळी, विहिरी बांधल्या. जलसंधारणाच्या या कामामुळे विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनले. २०१३ मध्ये रोपवाटिकेची जबाबदारी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्याकडे देण्यात आली. त्यांनी विविध देशी वृक्ष, फुलझाडे यांची रोपे बनवण्यास सुरुवात केली. याच रोपांची लागवड करून विद्यापीठ परिसर हिरवागार झाला. सध्या या रोपवाटिकेत जास्वंद, रातराणी, देशी गुलाब यांचे रोपे बनवली आहेत, तर जांभूळ, पाम, पेरू, करंज, अर्जुन, वड, पिंपळ यांचीही रोपे लावली होती. शासकीय दरामध्ये याची विक्रीही केली जाते. राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी ही रोपवाटिका फुलवण्यात मोठे योगदान दिले.



शिवाजी विद्यापीठातील रोपवाटिका.